Janata Shikshan Sanstha's

# KISAN VEER MAHAVIDYALAYA,WAI



## National Service Scheme

## MERI MATI MERA DESH AMRUT KALASH

16/09/2023

## 1. Report in English

**In Kisan Veer College of Janata Shikshan Sansthan here, a felicitation ceremony was held for the ex-servicemen of Wai taluka under the initiative "Meri Mati, Mera Desh" for the Amrit Maholavi year of the country in the presence of Mr. Madan Dada Bhosle, President of Janta Shikshan Sanstha. Ex-soldiers from Wai taluka who participated in the Pakistan issue, as well as ex-soldiers living in Wai and retired from national service participated.**

**At the beginning of the program National Service Yojana volunteer. Rasika Vyahlikar, ex-serviceman, president of the organization, Mr. Madandada Bhosle, NSS volunteer, NCC student, professor, office staff collected the holy soil from the river Krishna in the Kalash with Sachmana. This holy urn will go to Delhi, and under the initiative Meri Mati, Mera Desh, a grand garden named Amrit Vatika will be created by the Government of India in honor of the grandmothers and ex-soldiers who fought with their lives for the country's service in Delhi, and this soil will be used for that garden. With the participation of ex-servicemen, the atmosphere was filled with patriotism. The area was filled with slogans like Bharat Mata Ki Jai, Chhatrapati Shivaji Maharaj Ki Jai. After that, the ex-servicemen's felicitation ceremony was held by the President of Janata Shikshan Sanstha Hon. Madandada Bhosle presented a badge of honor and a mango tree. On this occasion, the principal of the college Dr. Gurunath Fagare, Captain Dr. Dr. Sameer Pawar, Program Officer. Sangram Thorat Dr. Ambadas Sakat, NSS Adviser Dr. Sunil Sawant, Second Adviser Dr. Chandrakant Kamble, Dr. Gnayandev Zambare, Dr. Vinod Veer, College Student of N.C.C and National Service Scheme, President of Wai Taluka Ex-Serviceman Association Mr. Sunil Shinde, Karnal R. D. Nikam Sainik Bank Director Mr. Shamrao Rajpure, Mr. Rajesh Tarte Saheb and many ex-servicemen of the taluka were present.**

**Program officer Dr. Sangram Thorat introduced the program, Dr. Arun Sonkamble while Dr. Ambadas Sakat thanked the attendees. Manoj Shinde, Gajapan Jadhav Junior Clerk Jitendra Chavan worked hard for the success of the program. NSS volunteers, NCC student professors, office staff, students attended the program in large numbers.**

Kisan Veer Mahavidyalaya, Wai

# 2. Report In Marathi

**"अहवाल"**

वाई दि. १६/०९/२०२३ येथील जनता शिक्षण संस्थेच्या किसन वीर महाविद्यालयात देशाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त "मेरी माटी, मेरा देश" या उपक्रमांतर्गत वाई तालुक्यातील माजी सैनिकांचा सत्कार सोहळा जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.मदनदादा भोसले यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या सन्मान सोहळ्यास वाई तालुक्यातील १९६२ मध्ये झालेल्या चीनच्या तसेच १९७१ मध्ये झालेल्या पाकिस्तान युद्धात सहभागी झालेले वाई तालुक्यातील माजी सैनिक, तसेच वाईत राहणारे व देशसेवेतून निवृत्त झालेले माजी सैनिक सहभागी झाले होते. हा सन्मान सोहळा महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेविका कु. रसिका व्याहळीकर हिने तयार केलेल्या मातीच्या कलशात माजी सैनिक, संस्थेचे अध्यक्ष मा. मदनदादा भोसले, एन.एस.एस चे स्वयंसेवक, एन.सी.सी चे छात्र, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी यांनी कृष्णा नदीतील पवित्र माती सन्मानाने कलशात एकत्रित केली. हा पवित्र कलश दिल्ली येथे जाणार असून; मेरी माटी, मेरा देश या उपक्रमाअंतर्गत दिल्ली येथे देशसेवेसाठी प्राणपणाने लढलेल्या आजी-माजी सैनिकांचे सन्मानार्थ भारत सरकारच्या वतीने अमृत वाटिका नावाने भव्य बागेची निर्मिती केली जाणार असून; त्या बागेसाठी या मातीचा उपयोग होणार आहे. माजी सैनिकांच्या सहभागाने वातावरण देशप्रेमाने भारावून गेले होते. भारत माता की जय, छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. तदनंतर माजी सैनिकांचा सत्कार समारंभाचा कार्यक्रम जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. मदनदादा भोसले यांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि एक आंब्याचे झाड देऊन करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे ,राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅप्टन डॉ. समीर पवार, कार्यक्रम अधिकारी डॉ.संग्राम थोरात, डॉ. अंबादास सकट, एन एस एस चे सल्लागार डॉ सुनील सावंत, दुसरे सल्लागार डॉ चंद्रकांत कांबळे, डॉ. ज्ञानदेव झांबरे,डॉ. विनोद वीर महाविद्यालयातील प्राध्यापक, राष्ट्रीय छात्र सेनेचे व राष्ट्रीय सेवा योजनेचे महाविद्यालयातील विद्यार्थी, वाई तालुक्यातील माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष श्री. सुनील शिंदे साहेब, कर्नल आर. डी. निकम सैनिक बँकेचे संचालक श्री शामराव राजपुरे,श्री राजेश तरटे साहेब, तसेच तालुक्यातील माजी सैनिक बहुसंख्येने उपस्थित होते.

या सन्मान सोहळ्यामध्ये आपले मनोगत व्यक्त करताना श्री. शामराव राजपुरे यांनी "माजी सैनिकांना बोलावून घेऊन, त्यांचा सन्मान येथे केला. त्याबद्दल मी सर्व माजी सैनिकांच्या वतीने जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. मदनदादा भोसले यांचे मनापासून आभार व्यक्त केले. देशाप्रती असणारी श्रद्धा जनता शिक्षण संस्थेच्या किसन वीर महाविद्यालयमध्ये आम्हास दिसून येते. आपण जिथे काम करू तिथे इमानेइतबारे काम केले तर ती देशसेवाच आहे". असे उद्गार काढले. माजी सैनिक श्री तरटे यांनी "कृष्णा नदीतील माती आम्ही त्या कलशामध्ये टाकलेली आहे आणि तो कलश दिल्ली येथे जाणार आहे. ही आम्हा सैनिकांना अभिमानाची बाब आहे" असे सांगून सैनिकांचा सत्कार केल्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.

या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुरुनाथ फगरे म्हणाले की, "प्रत्येकाने सैनिकाचा सन्मान केला पाहिजे. सैनिक कठीण परिस्थितीत काम करीत असतात. सैनिकांमुळेच देश सुरक्षित आहे. त्यामुळे ते खरे देशाचे सेवक आहेत".असे गौरव उद्गार काढले. मा. मदनदादा भोसले म्हणाले की," देशातील पहिल्या सैनिक स्कूलचा मी विद्यार्थी आहे. याचा मला सार्थ अभिमान आहे. शिक्षण घेत असताना सैनिक स्कूलचे प्राचार्य कर्नल पुरी यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून शिक्षण घेतले. जीवनाच्या रंगमंचावर सगळ्याच भूमिका आपण साकारू शकत नाही म्हणूनच "जय जवान जय किसान" हा आदर्श डोळ्यासमोर ठेवून मी किसन वीर महाविद्यालयांमध्येच शिक्षण घेण्याचा निर्णय घेतला. २६/११ च्या अतिरेकी हल्ल्यामध्ये शहीद झालेल्या पोलीस जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी मी बरोबर एक वर्षानंतर हातात मेणबत्ती पेटवली. किसन वीर कारखान्याचा चेअरमन असताना २६/११ मध्ये शहीद झालेल्या शहिदांचे देशातील सर्वात मोठे स्मारक उभे केले. याप्रसंगी दादा पुढे म्हणाले की, माजी सैनिकांना माझ्याकडून सर्व ती मदत व सुविधा पुरवल्या जातील . कृष्णेची सुपीक माती देशाचा सन्मान वाढवण्याचे निश्चित कार्य करेल". कॅप्टन डॉ समीर पवार यांनी माजी सैनिक सत्कार यादीचे वाचन केले.

कार्यक्रम अधिकारी डॉ. संग्राम थोरात यांनी प्रास्ताविक केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अरुण सोनकांबळे यांनी केले तर डॉ.अंबादास सकट यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मनोज शिंदे, गजानन जाधव, कनिष्ठ लिपिक जितेंद्र चव्हाण यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास एन एस एस चे स्वयंसेवक, एन सी सी चे छात्र, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी- विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

Wai Dist. Satara

PRINCIPAL
KISAN VEER MAHAVIDYALAYA
Wai. Dist. Satara

# 3. Activity Permission Letter of Principal

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004,
MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000
www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४,महाराष्ट्र
NATIONAL SERVICE SCHEME

Std. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

ई-मेल आयडी – nss@unishivaji.ac.in    दूरध्वनी ०२३१-२६०९१७६

संदर्भ.जा.क्र. शिवाजी वि./ रा.से.यो/791    दिनांक 15/07/2023

स्मरणपत्र – 1

Shikshan Sanstha's
Veer Mahavidyalaya
Dist. Satara
Inward No. 29A/291
Date 16/07/2023

| | |
|---|---|
| प्रति,<br>मा. प्राचार्य / प्राचार्या<br>सर्व संलग्न महाविद्यालये,<br>कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्हा | प्रति,<br>मा. अधिविभागप्रमुख,<br>सर्व संलग्न अधिविभाग,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर |

**विषय** : **'मेरी मिट्टी मेरा देश '** या उपक्रमामध्ये सक्रिय सहभागी होणेबाबत...

संदर्भ : संदर्भ. जा.क्र. शिवाजी वि./रा.से.यो/779 दिनांक 10 जानेवारी, 2023 रोजीचे पत्र...

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार विद्यापीठ संलग्न सर्व रासेयो महाविद्यालयांनी **'मेरी मिट्टी मेरा देश '** या उपक्रमाचे आयोजन आपल्या महाविद्यालयामध्ये करणे अनिवार्य असल्याचे याबाबत आपणास यापूर्वी कळविण्यात आलेले आहे. तरीही आतापर्यंत फक्त 288 नोंदणी दिसून येत आहेत. ही बाब अतिशय गंभीर आहे. तरी आपण **https://nsf.yas.gov.in/nss** या लिंकचा वापर करून आपल्या जास्तीत जास्त स्वयंसेवकांना नोंदणी करावयास सांगावे. तसेच सदर नोंदणी केलेल्या स्वयंसेवकांची यादी बैठक अहवालासोबत जोडावी. सदर उपक्रम सर्व ग्रामपंचायतीमध्ये हा उपक्रम राबविला जाणार असल्याने आपणास कोणतेही गाव या उपक्रमांतर्गत निवडण्यास मुभा आहे. सदर कॅम्पसाठी निवडलेल्या गावाशी या कार्यक्रमाबाबत पत्रव्यवहार करून घ्यावा म्हणजे पुरस्काराबाबतही याचा उपयोग होईल. याअगोदर पाठविलेल्या पत्रासोबत आपणास Format पाठविलेला आहे.

या उपक्रमाअंतर्गत आपल्या महाविद्यालयातील **एन.एस.एस स्वयंसेवकांना दि. 26 जूलै ते 2 ऑगस्ट, 2023 या कालावधीत ग्रामपंचायतीमध्ये कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्यासाठी कळवावे.. याबाबतची कार्यवाही तात्काळ करणे आवश्यक आहे.** दि. १७.०७.2023 पर्यंत कार्यवाही करून अहवाल विभागास सादर करावा.

कळावे,

आपला विश्वासू,
15/7/23
संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना

15/7/2023

Dr. Thorat/ Dr. Salkat

15.07.23    15-7-2023

205

# 4. Notice In English & Marathi

office,
Kisan Veer College, Wai
dated 15/09/2023

Notice-

Volunteers of the National Service Scheme Department of Senior Colleges are informed that On behalf of Rashtriya Seva Yojana and Rashtriya Chhatra Sena, under the "Meri Mati Mera Desh" campaign, soil will be collected in Amrit Kalsha on Saturday 16th September 2023 at 90.00 am.

However, all volunteers at 8.30 am. To be present in the garden in front of the college

कार्यालय,
किसन वीर महाविद्यालय, वाई
दिनांक – १५/०९/२०२३

सूचना –

वरिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांना कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने "मेरी माटी मेरा देश" अभियान अंतर्गत शनिवार दि. १६ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी ९०.०० वाजता अमृत कलशात माती संकलन केले जाणार आहे.

तरी, सर्व स्वयंसेवकांनी सकाळी ८.३० वा. महाविद्यालयासमोरील बागेत उपस्थित राहणेचे आहे.

डॉ. संग्राम थोरात डॉ. अंबादास सकट
कार्यक्रम अधिकारी

प्राचार्य
Principal
Kisan Veer Mahavidyalaya, Wai
Tal. Wai, Dist. Satara

KISAN VEER MAHAVIDYALAYA Wai, Dist. Satara

प्रत –

१. विद्यार्थ्यांना वर्गात वाचून दाखविणेसाठी
फाईल क्र. 89 A

# 5. Attendance Sheet:
# Including Teachers, Students
# (Male & Female) Attendance

| . No. | Name | Mobile No |
|---|---|---|
| 31 | Vaishnavi Dattatray Mahamuni | 9158561401 |
| 32 | Durga Dipak Bhoite | 8856987539 |
| 33 | Sanika Sachin gole | 9021246875 |
| 34 | Pragati Mohan Mandhare | 9325384406 |
| 35 | Mahek Munir shaikh | 7620921392 |
| 36 | Aakanksha Umesh Gaikwad | 9146795332 |
| 37 | Bhagyashri Mukhid kere | 9022202820 |
| 38 | Pooja Vijay Jadhav | 9359970518 |
| 39 | Siddhi Atish Dudhe | 7249891027 |
| 40 | Sanika Mangesh Pawar | 7058096972 |
| 41 | Sakshi krushna Gole | 9579167525 |
| 42 | Anuja Bharat Pawar | 8605127732 |
| 43 | Dhanawade Mrunali santosh | 8830799942 |
| 44 | Anjali Ramesh shelar | 9049271919 |
| 45 | Nandini Vikas Mandhare | 9022565719 |
| 46 | Pooja Suresh dhotre | 8177848934 |
| 47 | Vaishnavi maruti kapase | 8149105096 |
| 48 | Muskan Ashpak kazi | 9860647786 |
| 49 | pawar shravani Dipak | 7028399124 |
| 50 | kshirsagar Nikita Anil | 9021930119 |
| 51 | Pawar Saloni Shekhar | 8767863561 |
| 52 | Suryawanshi Shital Shankar | 8697351069 |
| 53 | Vibhute Pooja Mohan | 8652657151 |
| 54 | Vairat Priyanka Ananda | 9960734731 |
| 55 | Bhosale Trupti krishnat | 8857813660 |
| 56 | kambale Mayuri Meghnath | 9172860019 |
| 57 | Bagal Aishwarya Somnath | 9021580019 |
| 58 | Dabhade sharvari Milind | 7276014019 |
| 59 | Bhosale Pratiksha pradip | 7028408506 |
| 60 | Sneha Rajput | 6006687912 |

| Sr.No | Name of the Teacher | Designation | Signature |
|---|---|---|---|
| 01 | डॉ. घोरात एस. जी. | सह. प्राध्यापक | [signature] |
| 2 | डॉ. भगत ए. डी | | [signature] |
| 3 | प्रा. भोसले एन. ए. | सहा. प्राध्यापक | [signature] |
| 4 | Dr. Sonkamble Arun Ashok | Asst. Prof. | [signature] |
| 05 | प्रा. सुमती कांबळे | Assit. Prof. | [signature] |
| 06 | Mr. R. S. Jaykar | Asst. Prof | [signature] |
| 07 | Capt. Dr. Sameer A. Pawar | Director of P.E. | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

| Sr. No | Participants | Male | Female | Total |
|---|---|---|---|---|
| 01 | Students | 03 | 27 | 30 |
| 02 | Teachers | 05 | 02 | 07 |
| | **Total** | 08 | 29 | 37 |

[signature] [signature]
**Program Officer**
**NSS Department, KVM, Wai**

I. S. SANSTHA'S KISAN VEER MAHAVIDYALAYA, WAI, Dist. Satara

[signature]
**Principal**
**Kisan Veer Mahavidyalay, Wai**

# 6. News with Date & Photos With Caption




**Hon. President Madandada Bhosale**



**Jayghosh of Bharat Mata**

पुढारी

# वाई तालुक्यातील माजी सैनिकांचा सन्मान

**वाई : पुढारी वृत्तसेवा**

येथील जनता शिक्षण संस्थेच्या किसन वीर महाविद्यालयात देशाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त 'मेरी माटी मेरा देश' या उपक्रमांतर्गत वाई तालुक्यातील माजी सैनिकांचा सत्कार सोहळा पार पडला.

जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मदन भोसले यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. त्यांच्या हस्ते माजी सैनिकांचा सन्मानचिन्ह व एक आंब्याचे झाड देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे, राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅप्टन डॉ. समीर पवार, कार्यक्रम अधिकारी डॉ. संग्राम थोरात, डॉ. अंबादास सकट, डॉ. सुनील सावंत, डॉ चंद्रकांत कांबळे, डॉ. ज्ञानदेव झांबरे, डॉ. विनोद वीर, सुनील शिंदे, शामराव राजपुरे, राजेश तरटे उपस्थित होते.




**वाई : 'मेरी माटी मेरा देश' उपक्रमात कलश पूजनप्रसंगी मदन भोसले, डॉ. गुरुनाथ फगरे, कॅप्टन डॉ. समीर पवार, डॉ.संग्राम थोरात आदी.**

मदनदादा भोसले म्हणाले, देशातील पहिल्या सैनिक स्कूलचा मी विद्यार्थी आहे, याचा मला सार्थ अभिमान आहे. माजी सैनिकांना माझ्याकडून सर्व ती मदत व सुविधा पुरवल्या जातील. कृष्णेची सुपीक माती देशाचा सन्मान वाढवण्याचे निश्चित कार्य करेल. कॅप्टन डॉ. समीर पवार यांनी माजी सैनिक सत्कार यादीचे वाचन केले.

डॉ. संग्राम थोरात यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन डॉ. अरुण सोनकांबळे यांनी केले. डॉ. अंबादास सकट यांनी आभार मानले.

My Satara Edition
Sep 22, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

**NEWS – Dally Pudhari**

Kisan Veer Mahavidyalaya, Wai